-: प्रेस नोट :- दिनांक २०/०६/२०१८

**डेक्कन,पुणे येथील बांधकाम व्यावसायिकावर खुन हल्ला करण्यामधील प्रमुख सुत्रधार व कुविख्यात टोळीशी संबंध असलेल्या फरारी आरोपीस गुन्हे शाखेकडील विशेष पथकाने पहाडगंज,दिल्ली येथुन शिताफीने केली अटक**

डेक्कन पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर १०/२०१८५ भा.दं.वि.कलम ३०२,२०१७,आर्म अॅक्ट कलम ३ सह २५,२७ संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन-१९९९ चे कलम ३(१)(I),३(२),३(४) प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास श्री.समीर शेख सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे-०१,गुन्हे शाखा,पुणे शहर हे करीत आहेत. दिनांक १३/०१/२०१८ रोजी रात्रौ.२३:१० वाजताचे सुमारास गुन्हयातील फिर्यादी अतित देवेन शहा वय-२९वर्ष,धंदा-रिअल इस्टेट,रा-फ्लॅट नंबर ०४,सायली अपार्टमेंट लेन नंबर ०७,प्रभात रोड,पुणे यांचे मयत वडील देवेन जयसुखलाल शहा वय-५६वर्ष,रा-सदर यांचेवर दोन अज्ञात इसमांनी येवुन गोळीबार करून खुन केला होता.

दाखल गुन्हयाचे तपासामध्ये प्राप्त करण्यात आलेल्या सी.सी.टिव्ही फुटेजवरून व गुन्हयाचे झाले तपासावरून १) रविंद्र सदाशिव चोरगे वय-४०वर्ष,रा-केअर ऑफ पासकंटी फ्लॅट नंबर ०३ निल पदम् सोसायटी,अमृतनगर, माणिक बाग,सिंहगड रोड पुणे २) राहुल चंद्रकांत शिवतारे वय-४५वर्ष,रा-ज्योर्तिलिंग अपार्टमेंट तळ मजला, जाधव नगर, वडगाव बुद्रुक पुणे ३) सुरेंद्र शामकेर पाल वय-३६वर्ष,रा-कॅस्टल मिल,आझाद नगर,ठाणे पश्चिम ४) शंकर लक्ष्मण नवले वय-५०वर्ष,रा-वात्सल बंगला,सर्व्हे नंबर ४७/०५,साईनगरी,चंदननगर पुणे ५) सुनिल ऊर्फ सोनु मदनलालजी राठोर वय-३४ वर्ष,रा-घर नंबर ११४/०२,निलगंगा,राजेंद्रनगर,ता व जि-उज्जैन,राज्य-मध्यप्रदेश ६) नितीन दशरथ दांगट वय-३६वर्षे,रा-सर्व्हे ११८/२/सी,तेजोवलय बी/०३/१०२,रविराज हौसिंग सोसायटी,वारजे माळवाडी,पुणे ७) समीर रजनीकांत सदावर्ते वय-४२ वर्ष,रा-फ्लॅट नंबर ८०१,कुमार मिलेनियम,शिवतीर्थ नगर,कोथरुड,पुणे यांना यापुर्वी अटक करण्यात आली होती. गुन्हयातील आरोपी क्रमांक १ व २ यांनी यातील मयत इसमांचा त्यांचेकडील पिस्टलने फायरिंग करून खुन केला होता. आरोपी क्रमांक ३ यांचेकडे गुन्हयात वापरलेले पिस्टल व राऊंड मिळाले. तसेच आरोपी क्रमांक ८ राजेश ऊर्फ पंडीत कमल अग्रवाल वय-४०वर्ष,धंदा-रियल इस्टेट,रा-१०२ पॅरल डझल,एच ५ श्रीजी व्हिला,बिचोली मर्दाना,इंदौर,राज्य-मध्यप्रदेश हा आरोपी क्रमांक १ यांचेशी पुर्वीपासुन संपर्कात होता.

सदर गुन्हयातील मुख्य सुत्रधार व कुविख्यात टोळीशी संबंध असलेला राजेश ऊर्फ पंडीत कमल अग्रवाल वय-४०वर्ष,धंदा-रियल इस्टेट,रा-१०२ पॅरल डझल,एच ५ श्रीजी व्हिला,बिचोली मर्दाना,इंदौर,राज्य-मध्यप्रदेश हा गुन्हा घडलेपासुन सुमारे ५ महिन्यापासुन फरार झाला होता. गुन्हयातील फरारी आरोपी राजेश ऊर्फ पंडीत कमल अग्रवाल याचा गुन्हे शाखेकडील वेगवेगळया पथकाकडुन इंदौर,मध्यप्रदेश,दिल्ली,उत्तरप्रदेश,छत्तिसगड व गुजरात राज्यात शोध घेणे चालु होते. त्यानंतर दिनांक १९/०६/२०१८ रोजी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे वर नमुद आरोपी हा दिल्ली येथे वास्तव्यास असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने सदर आरोपीस पहाडगंज,दिल्ली येथुन शिताफीने ताब्यात घेवुन त्यास गुन्हयात दिनांक १९/०६/२०१८ रोजी अटक केली आहे. सदर आरोपीविरूध्द यापुर्वी वरळी पोलीस स्टेशन बृहन्मुंबई येथे भा.दं.वि .कलम ३९९,४०२ व आर्म अॅक्ट तसेच चिमनगंज पोलीस स्टेशन,उज्जैन,राज्य-मध्यप्रदेश येथे भा.दं.वि.कलम ४२० प्रमाणे गुन्हे दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. तसेच दाखल गुन्हयात अभिमन्यू रामप्रसादनाथ तिवारी रा-कॅसर मिल, आझादनगर राबोडी,ठाणे हा फरार असुन त्याचा शोध घेणे सुरू आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त पुणे, श्री.रविंद्र कदम पोलीस सह आयुक्त,श्री.प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.पंकज डहाणे,पोलीस उप-आयुक्त,गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली समीर शेख,स.पो.आ.गुन्हे-१, स.पो. नि.सुनिल गवळी,पोलीस कर्मचारी अतुल गायकवाड, दिनेश गडांकुश, अनिल शिंदे, अमोल भोसले, महेश पवार, किशोर वग्गु, सागर तोरडमल यांनी केली आहे.


पुणे शहर पोलीस